# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स २२६९२१०२/०००७.
तार - EDUTECH E-mail : desk4a@dte.org.in Internet :http/www.dte.org

कार्यालयीन आदेश

क्रमांक : ४अ/आस्था/२००९/कंपुनि/६७७९
दिनांक : १६.११.२००९

पहा : १. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र बैठक-१००२/(९१/२००२)/आस्था-१, दिनांक २५.०७.२००२
२. शासन पुरक पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकिर्ण-१००२/(५५३/२००२)/ आस्था-१, दिनांक २७.०८.२००२
३. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकिर्ण-१००२/(५५३/२००२)/आस्था-१, दिनांक १९.०७.२००३.
४. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक एससीटी-६५०५/(१७४/०५)/तंशि ४, दिनांक २१.१०.२००५
५. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक २००७/(२१७/०७)तांशि-२, दि ०२.११.२००७
६. या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्रमांक ४अ/आस्था/२००७/३०३५, दिनांक ०५.११.२००७
७. या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्रमांक ४अ/आस्था/२००७/३०३३, दिनांक ०५.११.२००७
८. या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्रमांक ४अ/आस्था/२००७/३१०७, दिनांक ०५.११.२००७
९. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक एससीटी-६५०९/(२१२/०९)/तंशि १, दिनांक १०.११.२००९

शासकीय तंत्रनिकेतनातील अध्यापकांची रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यास संदर्भीन क्रमांक १ ते ३ मधील आदेशातील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर दिली आहे. त्याअनुशंगाने नेमलेल्या कंत्राटी अध्यापकांना संदर्भाधीन क्रमांक ५ च्या आदेशान्वये पुनर्नियुक्त करण्यास दिलेल्या शासन मान्यतेस अनुसरुन संदर्भाधीन क्रमांक ६ ते ८ च्या कार्यालयीन आदेशान्वये निव्वळ कंत्राटी तत्वावर पुनर्नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सदर पुनर्नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी अध्यापकांच्या करारपत्रानुसार सेवा समाप्त केल्यानंतर ज्या अध्यापकांचे मुल्यांकन समाधानकारक आहे, अशा उमेदवारांना संदर्भ क्रमांक ९ अन्वये निव्वळ कंत्राटी तत्वावर नियुक्ती देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार शासकीय तंत्रनिकेतनातील संदर्भ क्रमांक ५ च्या शासन निर्णयास अनुसरुन संदर्भाधीन ६ ते ८ च्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यरत कंत्राटी अध्यापकांच्या नियुक्त्या त्यांनी दिलेल्या हमीपत्रानुसार विहित मुदतीत समाप्त करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे **सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई** यांच्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतनातील सेवा समाप्त केलेल्या कंत्राटी अध्यापकांपैकी ज्या अध्यापकांचे मुल्यांकन समाधानकारक आहे अशा कंत्राटी अध्यापकांना रुपये **१२०००/- या ठोक वेतनावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थेत या आदेशान्वये दिनांक १५.११.२०११ पर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगा पुरस्कृत उमेदवार अथ्वा नियमित स्वरुपात**

नियुक्तीने उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत निव्वळ कंत्राटी तत्वावर पुनर्नियुक्ती करीत आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पुनर्नियुक्तीचे पद | पुनर्नियुक्तीची संस्था |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती कुमुदिनी हिंदूराव पाटील | अधिव्याख्याता यंत्र | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई |
| २. | श्रीमती मिनाक्षी प्रविण देशपांडे | अधिव्याख्याता अणुविद्युत | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई |
| ३. | श्रीमती लतिका सुनिल शिंदे | अधिव्याख्याता रसायनशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई |
| ४. | श्रीमती सुरेखा नामदेव मोरे | अधिव्याख्याता माहिती तंत्रज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई |
| ५. | श्रीमती पी एल चेलानी | अधिव्याख्याता माहिती तंत्रज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई |
| ६. | श्री आशिश विजय अभ्यंकर | अधिव्याख्याता यंत्र | शासकीय तंत्रनिकेतन, पेण |
| ७. | श्रीमती सुविधा सुधाकर पिंगळे | अधिव्याख्याता अणूविद्युत | शासकीय तंत्रनिकेतन, पेण |
| ८. | श्रीमती वैशाली शांताराम माळी | अधिव्याख्याता रसायनशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, पेण |
| ९. | श्री प्रकाश एस शिरहट्टी | अधिव्याख्याता फूड टेक्नॉलॉजी | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण |
| १०. | श्री एम एन कुसुगडे | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |
| ११. | श्रीमती टि पी फणसोपकर | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |
| १२. | श्रीमती एम एच दातार | अधिव्याख्याता अणुविद्युत | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |
| १३. | श्रीमती एच एच कुलकर्णी | अधिव्याख्याता अणुविद्युत | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |
| १४. | श्रीमती ए एल करंबेळकर | अधिव्याख्याता संगणक | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |
| १५. | श्री सिकंदर अंकुश रसाळ | अधिव्याख्याता उपयोजित यंत्रशास्त्र | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |
| १६. | श्रीमती चारुशिला भास्कर पाटील | अधिव्याख्याता रसायन अभियांत्रिकी | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |
| १७. | श्रीमती भारती जितेंद्र चौधरी | अधिव्याख्याता पदार्थविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |
| १८. | श्रीमती सुनिता अविनाथ थोरात | अधिव्याख्याता पदाथविज्ञान | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे |

वरील उमेदवारांच्या कंत्राटी तत्वावरील पुनर्नियुक्त्या पुढील अटींच्या अधीन राहुन करण्यात येत आहेत.

१. कंत्राटी तत्वावर वरील अध्यापकांच्या नियुक्त्या दिनांक १५.११.२०११ पर्यंत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत अथवा नियमीत स्वरुपात उमेदवार उपलब्ध होणे यापैकी जे अगोदर घडेल तेवढया कालावधीसाठी असतील, त्यानंतर या कंत्राटी नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील.

२. वरील अध्यापकांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती रुपये १२०००/- (रुपये बारा हजार फक्त) या एकत्रित मासिक वेतनावर करण्यात येत असून त्यांना कोणत्याही प्रकारचे भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

३. संदर्भ क्रमांक ९ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या जोडपत्रातील करारनामा कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांनी प्रत्यक्ष रुजू होण्यापूर्वी संबंधित संस्थेत लिहून द्यावा लागेल, अन्यथा त्यांचे नियुक्ती आदेश रद्द ठरतील.

४. कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या सेवा बदलीपात्र राहणार नाहीत. मात्र प्रशासकीय कारणास्तव व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यासाठी गरज उद्भवल्यास त्यांची इतर शासकीय तंत्रनिकेतनात बदली करण्यात येईल.

५. कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्त्या त्यांचे शैक्षणिक / अध्यापनाचे काम समाधानकारक असण्यावर अवलंबून राहतील व कोणत्याही पुर्वसूचनेशिवाय संपुष्टात आणण्यात येतील व याबाबतीत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्य यांची शिफारस अंतिम राहील.

६. कंत्राटी तत्वावर नियुक्त उमेदवारांविरुध्द विद्यार्थ्यांची तक्रार असल्यास सदर तक्रारीबाबत संबंधित विभाग प्रमुख / प्राचार्यांच्या शिफारशीनुसार त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

७. कंत्राटी तत्वार नियुक्त करण्यात आलेल्या अध्यापकांनी या आदेशाच्या दिनांकापासून ४ दिवसांच्या आत रुजू व्हावे, जे उमेदवार दिलेल्या मुदतीत रूजू होणार नाहीत त्यांचा नियुक्तीचा आदेश आपोआप संपुष्टात येईल, त्याबाबत पुनर्विचार करण्यात येणार नाही.

८. कंत्राटी तत्वावर नियुक्त अध्यापकांच्या नियुक्त्या करारपत्रात नमुद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टांत येतील.

९. कंत्राटी तत्वावर नियुक्त केलेल्या अध्यापकांची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्याने संबधीतांना नियमित नियुक्तीधारकांचे लाभ मिळणार नाहीत.

१०. कंत्राटी तत्वावर नियुक्त असलेल्या अध्यापकांनी अध्यापनाबरोबरच सोपविलेली तद्नुषंगिक इतर प्रशासकीय कामे करणे बंधनकारक राहील.

११. कंत्राटी तत्वावर नियुक्त झालेल्या अध्यापकांनी, त्यांचेवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा नसल्याचे किंवा कोणत्याही प्रकारचे आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र त्यांनी स्वतंत्रपणे प्राचार्यांकडे सादर करणे अनिवार्य आहे.

१२. प्रस्तुत नियुक्त्या हया नव्याने करण्यात येत असून त्या निव्वळ कंत्राटी पध्दतीने असल्यामुळे संबंधित उमेदवारांना नियमित नियुक्ती धारकांचे लाभ मिळणार नाहीत. तसेच यापूर्वीच्या कंत्राटी सेवेचा कोणताही लाभ त्यांना अनुज्ञेय असणार नाही.

१३. ज्या प्रकरणी वरील कार्यपध्दतीचे पालन करण्यात येणार नाही, त्याप्रकरणी संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाही करण्यात येईल.

**( डॉ सु का महाजन )**
**प्र संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रत : मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

१. अधिदान व लेखा अधिकारी मुंबई (मानार्थ )(संबंधित प्राचार्यामार्फत)
२. कोषागार अधिकारी ठाणे, पेण, रत्नागिरी, मालवण,(मानार्थ )(संबंधित प्राचार्यामार्फत)
३. सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय ,मुंबई
४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई, ठाणे, पेण, रत्नागिरी, मालवण
   त्यांना कळविण्यात येते की, कंत्राटी तत्वावर पुनर्नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांचा शिकविण्याचा वस्तुनिष्ठ अहवाल दर ३ महिन्यांनी संबंधित विभागप्रमुखांमार्फत संचालनालयास सादर करावा.
५. संबंधित उमेदवार (पुनर्नियुक्ती दिलेल्या संबंधित संस्थेच्या प्राचार्यामार्फत)
६. कार्यासन क्रमांक ४अ , मुख्य कार्यालय मुंबई (निवड नस्ती )